कंत्राटदारांच्या नोंदणीचे सुधारित नियम
दि.२०/४/१९९८ च्या शासन निर्णयामधील
सुधारणा/बदलांबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर,२०००.

शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक सीएटी १०९६/प्र.क्र.१७२/इमारती -२ दिनांक २०/४/१९९८ अन्वये कंत्राटदारांच्या नोंदणीचे सुधारित नियम निर्गमित करण्यात आलेले आहेत सदरहू शासन निर्णयामधील काही तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा/बदल करण्यात येत आहेत.

१.० **कंत्राटदारांच्या नोंदणीचे वर्गीकरण** - अमर्यादित रकमेची कामे घेण्याची क्षमता असलेल्या कंत्राटदारांना सध्या वर्ग १ मध्ये नोंदणी देण्यात येते. कंत्राटदारांच्या क्षमतेनुसार वर्ग १ मधील नोंदणीसाठी खालीलप्रमाणे उपवर्गीकरण करण्यात यावे -

| उपवर्ग | कामाच्या रकमेची मर्यादा |
|---|---|
| वर्ग १ अ | रु. २५.०० कोटीपेक्षा अधिक (अमर्याद) |
| वर्ग १ ब | रु. १५.०० कोटीपेक्षा अधिक ते रु.२५ कोटी |
| वर्ग १ क | रु. ७.५० कोटीपेक्षा अधिक ते रु.१५ कोटी |

१.१ कंत्राटदारांनी सादर केलेल्या अद्ययावत आयकर निपटारा प्रमाणपत्रातील गेल्या तीन ते पाच वर्षांतील किमान/लघुत्तम उलाढालीच्या ४.५ पट किंवा कमाल/महत्तम उलाढालीच्या ३ पट यापैकी जी अधिक असेल ती रक्कम वर्ग १मधील वर्गीकरणासाठी विचारात घेण्यात यावी.

१.२ आयकर निपटारा प्रमाणपत्राची खातरजमा आयकर विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून स्वतंत्रपणे करण्यात यावी. अन्यथा असे प्रस्ताव नोंदणीसाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.

२. **परिच्छेद क्र.२ (ब) (v)** - कंत्राटदाराने पार पाडलेल्या/हाती असलेल्या खाजगी कामांच्या बाबतीत अनुज्ञप्तीधारक वास्तुशास्त्रज्ञांनी/चार्टर्ड इंजिनियर ह्यांनी प्रमाणित केले असेल तरच या खाजगी कामांच्या अंदाजित खर्चाच्या ५० टक्के एवढी रक्कम उलाढालीसाठी तथा हाती असलेल्या कामांसाठी विचारात घेण्यात यावी.

३. **परिच्छेद क्र.३ (अ) (iii)** - वर्ग १ ते वर्ग ५ मधील नोंदणीसाठी संबंधित कंत्राटदारांकडे सोबतच्या परिशिष्टामध्ये विहीत करण्यांत आलेल्या गटांपैकी कोणत्याही एका गटातील संपूर्ण यंत्रसामुग्री स्वतःच्या मालकीची असणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे अशा यंत्रसामुग्रीच्या मालकीबाबत निर्विवाद व निःसंदिग्ध पुरावा प्रस्तावासोबत सादर करणेही आवश्यक आहे.

उपरोक्त बदल आणि सूचना तात्काळ अमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा. मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
मा.मंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय सहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, महाराष्ट्र
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई, महाराष्ट्र
औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डींग
नरीमन पॉइंट, मुंबई/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय (MOST),चेंबूर,मुंबई
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी,मुंबई/महानगर
पालिका,ठाणे/पुणे/कल्याण
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग/जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२ (निवडनस्ती).

# परिशिष्ट

**कंत्राटदारांकडे खालीलपैकी कोणत्याही एका गटातील संपूर्ण यंत्रसामुग्री स्वतःच्या मालकीची असणे आवश्यक आहे.**

| यंत्रसामुग्रीचा तपशील | वर्ग-१/२/३ | वर्ग-४/४अ | वर्ग-५ |
|---|---|---|---|
| **गट-१** | | | |
| ट्रक्स/टिप्पर्स/ट्रॅक्टर-ट्रॉली | ४ | ३ | २ |
| कॉंक्रीट मिक्सर | ३ | २ | १ |
| व्हायब्रेटर | ३ | २ | १ |
| ५ हॉर्स पॉवरचे पंप | २ | १ | १ |
| सेंट्रींगचे साहित्य | ५०० चौ.मि. | ३०० चौ.मि. | १०० चौ.मि. |
| मेकॅनिकल हॉइस्ट | १संच | - | - |
| **गट-२** | | | |
| ट्रक्स/टिप्पर्स/ट्रॅक्टर ट्रॉली | १० | ६ | २ |
| एक्सकेवेटर | २ | १ | - |
| रोड रोलर (डीआरआर) | २ | १ | १ |
| व्हायब्रेटरी रोलर | १ | - | - |
| वॉटर टॅंकर | २ | १ | १ |
| एअर कॉंप्रेसर | २ | १ | - |
| कॉंक्रीट मिक्सर | २ | १ | १ |
| व्हायब्रेटर | २ | १ | १ |
| **गट-३** | | | |
| ट्रक्स/टिप्पर्स/ट्रॅक्टर ट्रॉली | ६ | ३ | २ |
| रोड रोलर (डीआरआर) | २ | १ | १ |
| व्हायब्रेटरी रोलर | १ | - | - |
| आस्फाल्ट मिक्सर व बॉयलर | १ | १ | १ |
| ड्रम मिक्स प्लांट | १ | - | - |
| सेन्सॉर पेव्हर फिनिशर | १ | - | - |
| मेकॅनिकल आस्फाल्ट स्प्रेयर | १ | - | - |
| कॉंक्रीट मिक्सर | १ | १ | १ |
| व्हायब्रेटर | १ | १ | १ |